## दृष्टिक्षेपात तालुका

| | | | |
|---|---|---|---|
| • क्षेत्रफळ (चौ.किमी) | २,२५,८२८ | • महसूल मंडळे | ५ |
| • गावांची संख्या | ६० | • जि.प.सर्कल | ५ |
| • ग्रामपंचायती | ६० | • प्रा.आरोग्य केंद्रे | ५ |
| • नगरपरिषद | नाही | • शाळांची संख्या | १९० |
| • पोलीस ठाणी | १ | • महाविद्यालये | १ |

## बिरोबा देवस्थान

कवठेमहांकाळ तालुक्यातील आरेवाडी गाव म्हंटले की, तेथील प्रसिद्ध देवस्थान बिरोबा डोळ्यापुढे उभे राहते. बिरोबा हे दैवत लिंगायत आहे. बिरोबा हे धनगर समाजाचे आराध्य दैवत मानले जाते. बिरोबा मंदिरात ब्रम्हा, विष्णु, महेश या मूर्ती आहेत. कर्नाटकातून हे देव डोंगरावर आले. या डोंगरातूनच देव भक्ताच्या दर्शनासाठी आरेवाडीच्या वनात आले.

येथे बिरोबाची खूप मोठी यात्रा भरते. यात्रेच्या पहिल्या दिवशी देवाला गोड नैवेद्य दाखवतात, बिरोबाच्या उजव्या बाजूला बिरोबाचा भक्त याचे मंदीर आहे. त्याच्या पलीकडे मायाक्कादेवीचे मंदीर आहे. यात्रेला येणारा धनगर समाज यात्रेच्या तिसऱ्या दिवशी बकरी बळी देतात. ही बकरी बिरोबाला बळी देत नाहीत व नैवेद्यही दाखवला जात नाही. तो नैवेद्य दाखवतात असे त्या समाजाचे म्हणणे आहे. यात्रेच्या कालावधीत बिरोबाची रात्री दहानंतर पालखी निघते. मंदीराभोवती पालखी प्रदक्षिणा पहाटेपर्यंत काढली जाते. नवरात्र उत्सवात देखील घटस्थापनेपासून विजयादशमी पर्यंत पालखी काढली जाते.

## दंडोबा डोंगर

दंडोबा डोंगर तालुक्याच्या सीमेवर खारशींग गावाजवळ आहे. पाच ग्रामपंचायतींच्या हद्दीत सुमारे ११५० हेक्टरवर पसरलेल्या डोंगरावर पुरातन दंडनाथाचे मंदिर असून सुमारे शंभर फूट पोखरून तयार केलेल्या गुहेतच नागाच्या वेटोळ्यात दंडनाथाची मूर्ती आहे. प्रदक्षिणा घालण्यासाठी अतिशय सुरेख पद्धतीने रस्तादेखील असून पुरातन काळातील चित्रे आता कालौघाने पुसट झाली आहेत. डोंगरावर सुमारे

Scanned by CamScanner

सव्वादोनशे वर्षापूर्वीचे शिखर आजही सुस्थितीत इतिहासाचा साक्षीदार म्हणून उभे आहे.

कवठेमहांकाळ येथे १९०७ ते १९०९ चे दरम्यान श्री महांकाली मंदिराचा जीर्णोद्धार झाला. देवीची स्थापना १५५० ते १६०० च्या दरम्यान झाली असल्याचे सांगितले जाते. महांकाली मुळेच कवठेमहांकाळ असे नाव पडले आहे.

## प्रमुख बाबी

* १९८२ मध्ये खानावळीमध्ये दलितांना प्रवेश देण्यासाठी चळवळ केली – **दादासाहेब ढेरे**
* दलितांना न्याय देण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या व्यक्ती – **प्रा.ढेरे, प्रकाश घड्याळे, चंद्रकांत लोंढे, भगवान वाघमारे, विश्वास साबळे, महादेव वाघमारे**
* १९७३-७४ वसंतदादांच्या उपस्थितीत नागज येथे पहिली पाणी परिषद घेतली – **ताराचंद शहा**
* पाणी संघर्ष समितीच्या माध्यमातून जोरदार रान उठविले – **नामदेव करगाणे, सत्यवान कुंभारकर, आप्पासाहेब शिंदे, राजाराम पाटील**
* बेदाणानिर्मितीसाठी प्रसिद्ध गावे – **शेळकेवाडी ते जुनोनी**
* द्राक्षबागांचे प्रमाण जास्त असणारी गावे – **देशिंग, खरशिंग**

## साहित्य परंपरा

१) **चारूतासागर** – ज्येष्ठ साहित्यीक – मळणगाव **कथासंग्रह** – मामाचा वाडा, नागीण,

२) **एकनाथ जगताप** – नाटककार **नाटके** – गावात आली, रक्त सांगेल पाप कुणाचे इ. ५ नाटके

३) **दयासागर बन्ने** – कवी **काव्यसंग्रह** – पळसफूल, पेचपर्व, हायकु

४) **प्रा. अनिल पाटील** **कथासंग्रह** – पोटपाणी

५) **प्रा. मोहन लोंढे** – कवी **काव्यसंग्रह** – चाक

६) **प्रा. आबासाहेब शिंदे** – कवी **काव्यसंग्रह** – माझ्या वाघोलीच्या भूमीत

७) **गो.स.चरणकर** – कवी **काव्यसंग्रह** – माळझर यासह तीन काव्यसंग्रह

८) **आप्पासाहेब पाटील** – कादंबरीकार **चारोळी संग्रह** – मनातल्या मनात

९) **प्रा.जी.के.कांबळे** – कथासंग्रह–अधुरा, रिबोट, कांदाचिर

१०) **निवृत्ती शेषस्वारे** – अग्रणीकाठचे शेजारी

Scanned by CamScanner

## जमीन

| | | | |
|---|---|---|---|
| • एकूण क्षेत्रफळ | ७३,५६२ | • डोंगराळ क्षेत्र | २,९५३ |
| • लागवडीखालील | ४०,०३५ | • पडीक क्षेत्र | ८,२२५ |
| • बागायत क्षेत्र | ५,९८६ | • वन क्षेत्र | ९२४ |
| • कोरडवाहू क्षेत्र | १५,४३९ | | |

## पर्यटन

| | | | |
|---|---|---|---|
| • एकूण मंदिरे | ५ | • किल्ले | नाही |
| • स्मारके | ४ | • डोंगर | २ |

Scanned by CamScanner

## प्रमुख गोष्टी

| | | | |
|---|---|---|---|
| • नदी | १ | • ओढे | ४० |
| • पिके | ६ | • बाजारपेठा | ६ |
| • जनावर बाजार | २ | • मुख्य बाजारपेठा | २ |

## कारखाने

| | | | |
|---|---|---|---|
| • साखर कारखाने | १ | • दूध प्रकल्प | २ |
| • वस्त्रोद्योग | नाही | • काजू प्रक्रिया उद्योग | १ |
| • कुटिरोद्योग | नाही | • फौंड्री | नाही |

Scanned by CamScanner